नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/१०/२०२६ (बुधवार )**

---

## पोलीस स्मृतिदिनानिमित्त नागपूर ग्रामीण पोलीसांचा कृतज्ञतापुर्ण उपक्रम ; १८ शहीद जवानांच्या कुटुंबीयांचा घरी जाऊन सन्मान

देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी, कायदा व सुव्यवस्था राखताना तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करतांना कर्तव्य बजावत प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या शौर्याचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी २१ऑक्टोबर हा दिवस **'पोलीस स्मृतिदिन'** म्हणून आदरपूर्वक पाळला जातो.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून यावर्षी पोलीस स्मृतिदिनानिमित्त नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे शहीद जवानांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला.मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्रीमती पूजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक (गृह), नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले, प्रभारी अधिकारी, मानव संसाधन शाखा आणि श्री सुधाकर कोये, कार्यालय अधीक्षक यांच्या नियोजनानुसार नागपूर ग्रामीण जिल्हाने १८ शहीद जवानांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तु देवुन त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला.

१८ शहीद जवानांपैकी १० शहीद जवान नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील असून ८ गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपुर जिल्ह्यांतील आहेत. यापैकी २ शहीद जवानांचे कुटुंबीय वर्धा जिल्ह्यात, तर १ शहीद जवानाचे कुटुंबीय परभणी जिल्ह्यात स्थायिक आहेत. या सर्व कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी विशेष पोलीस पथके नियुक्त करण्यात आली होती. परभणी जिल्हा येथे पोलीस हवलदार समाधान शंकरराव इंगळे, बनं ३८४, यांच्या कुटुंबीयांची तसेच वर्धा जिल्हा येथे पोलीस अंमलदार पुरूषोत्तम दशरथ घंगारे, बनं १०४९ आणि पोलीस अंमलदार वामन लक्ष्मणराव मेंढे, बनं १३०४, यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यात आली. भेटीदरम्यान शहीद जवानांच्या कुटुंबीयांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने विशेष सन्मानपत्र, संदेश आणि भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. पोलीस पथकांनी कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. तसेच महाराष्ट्र पोलीस दल सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास दिला.

**नागपुर ग्रामीण जिल्हयातील शहीद जवान** क्रं १) सहा पोलीस निरीक्षक प्रल्हाद डांगरे, नागपुर **क्रं २)** पोलीस हवलादार जयंत विष्णुजी शेरकर, बनं १२२४, **क्रं ३)** पोलीस हवलदार रविंद्र तुकाराम मानकर बनं १२७२, **क्रं४)** पोलीस हवलदार समाधान शंकरराव इंगळे, बनं

३८४, **क्रं ५)** पोलीस नाईक रितेश देवरावजी भोपरे, बनं १८३०, **क्रं ६)** पोलीस अंमलदार पुरूषोत्तम दशरथ घंगारे, बनं १०४९, **क्रं ७)** पोलीस अंमलदार महादेव बापुजी निरगुडकर, बनं २२७०, **क्रं ८)** पोलीस अंमलदार वासुदेव कोठीराम मेश्राम, बनं १०४५, क्रं ९)पोलीस अंमलदार विजय कापसे, बनं ३३८६, **क्रं १०)** पोलीस अंमलदार वामन लक्ष्मणराव मेंढे, बनं १३०४, **गडचिरोली जिल्हयातील शहीद जवान क्रं ११)** पोलीस अंमलदार संतोष मधु कोंडावार, बनं ११५४, **क्रं १२)** पोलीस हवलदार ओमप्रकाश गंगारतन मिश्रा , बनं ७०८, **क्रं १३)** पोलीस अंमलदार जितेंद्र येडबाजी वाघमारे , बनं २५६३, **क्रं १४)** पोलीस अंमलदार अमृत प्रभुदास भदाडे, बनं ५११३ , **गोंदीया जिल्हयातील शहीद जवान क्रं १५)** पोलीस उपनिरीक्षक किरणकुमार दिगंबरराव धोपडे , **क्रं १६)** पोलीस अंमलदार अंबरराज गुलाब बिसेन, बनं ४४६, **क्रं १७)**पोलीस अंमलदार रविकुमार सेवकराव जौंजाळ ,बनं १२८, **चंद्रपुर जिल्हयातील शहीद जवान** क्रं **१८)** पोलीस अंमलदार देविदास बापुराव हजारे ,बनं ८८७ अशा नमुद शहीद जवानांच्या कुटुंबियांची घरी जावुन भेट घेवुन आस्थेने विचारपुस करण्यात आली.

**शहीद जवानांचे बलिदान हे संपूर्ण पोलीस दलासाठी सदैव प्रेरणादायी आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, त्यांची आस्थेने विचारपूस करणे आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे पोलीस दलाचे कर्तव्य आहे. या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाद्वारे नागपूर ग्रामीण पोलीस दलाने शहीद जवानांच्या कुटुंबीयांप्रती आदर, सन्मान व कृतज्ञता व्यक्त केली.**




Crompton
Kitchen Appliances
AMEO
MIXER GRINDER



# चोरीचा गुन्हा उघड, आरोपी अटक
# ०१ लाख ०२ हजार ६७८ रूपयाचा मुद्देमाल जप्त
# वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. शशांत एन. एम. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांच्या मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे प्रभारी अधिकारी वडोदा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक २०/१०/२०२६ रोजी रोटावेटर चोरीचा गुन्हा उघड करून ०१,०२,६७८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १८/१०/२०२६ रोजी फिर्यादी नामे रुपेश माणिकराव चौधरी, वय ४५ वर्ष, राहणार श्रीनगर ढोरे लेआउट कोराडी रोड मानकापूर नागपूर यांनी पोलीस स्टेशन वडोदा येथे रिपोर्ट दिली की त्यांचे मौजा गारला शेतशिवरातून त्यांच्या शेतामध्ये ठेवलेला रोटावेटर किंमत १,०२,६७८/— रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेला होता. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ३०३(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

नमुद प्रकरणी वडोदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे तात्काळ फिर्यादी यांच्या शेतावरती काम करणारा मजूर आरोपी नामे **संजय भाऊरावजी झंजाळ, वय ३८ वर्षे ,रा. गारला, ता. कामठी, जिल्हा नागपूर याला** निष्पन्न केले. दिनांक २०/१०/२०२६ रोजी आरोपीला ताब्यात घेवुन त्यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने पोलीस स्टेशन वडोदा परिसरात रोटावेटर चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने सदर गुन्हयात चोरी गेलेला रोटावेटर किंमती १,०२,६७८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली.**




## पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत हरविलेले/गहाळ झालेले आणि चोरी गेलेले २० मोबाईलचा शोध घेवुन त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत हरविलेले/गहाळ झालेले व चोरी गेलेल्या मोबाईलचा शोध घेणे कामी विशेष मोहीम राविण्यात येत आहे.**

श्री शशांत एन एम, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोद आणि वडोदा पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मदतीने तांत्रीक पदधतीने शोध घेवून CEIR(Central Equipment Identity Register) पोर्टलचा वापर करुन २० मोबाईलचा शोध घेतला. पोलीस स्टेशन वडोदा येथे दिनांक २१/१०/२०२६ रोजी श्री शशांत एन एम, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या हस्ते सर्व शोधुन आणलेले २० मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत केले.

नागपुर ग्रामीण पोलीसांकडुन नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी त्यांचा मोबाईल हॅन्डसेट गहाळ झाल्या नंतर किंवा चोरीस गेल्यानंतर त्याची माहीती तात्काळ पोलीसांना द्यावी तसेच त्याबाबतची माहीती https://www.ceir.gov.in या पोर्टलवर माहीती भरून तक्रार नोंद करावी. त्यामुळे गहाळ झालेले किंवा चोरीस गेलेले मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेता येईल.




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २३ हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— दिनांक २०/१०/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सुरगाव शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाचगाव पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना मिळुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राष्ट्रपाल अशोक खोब्रागडे, वय ४० वर्ष, रा. सुरगाव ता. उमरेड जि. नागपूर २) धर्मेंद्र मुन्नाजी लोखंडे, वय २९ वर्ष, रा. सुरगाव ता. उमरेड जि. नागपूर ३)**

**अंकेश राजकुमार लोखंडे, वय २९ वर्ष, रा. सुरगाव ता. उमरेड जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम १५२०/—रूपये, ०२ ॲडरॉईड मोबाईल, असा एकुण २३,५२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या ०२ आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक २०/१०/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता **आरोपी नामे १) रोहीत सुदेश सांगोळ, वय ३० वर्ष, रा. प्लाट क्र ३७, पंचशिल नगर नागपुर २) शिवकुमार पूथ्वीराज गुप्ता, वय ३२ वर्ष, रा. वाठोडा नागपुर** हे मौजा रहाडी शिवार येथे संशयितरीत्या दिसून आले. पोलिसांनी त्याला थांबवून विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलीसांचा संशय बळावला. पोलिसांनी आरोपींचे ताब्यात २० फूट लांबीची कॉपर केबल मिळून आली. सदर केबलबाबत विचारणा केली असता त्यांचे कडुन कोणतेही समाधानकारक उत्तर मिळुन दिले नाही.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपींचे ताब्यातून २० फूट लांबीची कॉपर केबल किंमती ७०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातून मिळून आल्याने दोन्ही आरोपीतांविरूद्ध कलम १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यावर
## एन.डी.पी.एस कायदयान्वये ०५ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २०/१०/२०२६ रोजी विविध पोलीस स्टेशन येथे विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत आरोपी १. मिथुन मारोती खडसे, वय २९ वर्ष, रा. अरोली ता मौदा जि नागपुर २. यश बबलु खडसे वय २१ वर्ष रा अरोली ता मौदा जि नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत** आरोपी नामे १. कार्तिक रमेश खंडाते, वय २६ वर्ष, रा. वॉर्ड क्र. ०१, केळवद ता. सावनेर जि. नागपुर २. अनिल भिमराव गौरखेडे, वय ४२ वर्ष, रा. रामपुरी, ता. सावनेर, जि. नागपुर हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी नामे पवन शामराव पोटफोडे, वय २४ वर्ष, रा. वायगांव रोड बोरगांव पर्णवसन देवळी वर्धा, ह. मु. सिध्दार्थ रामटेके यांच्याघरी वार्ड नं ४, सातगांव किन्हाळा ता. हिंगणा, जि. नागपुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०९ गुन्हे दाखल,

**दिनांक २०/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०९ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे जमीर खान शमीम खान पठान, वय २८ वर्ष, रा. निजामुदीन कॉलनी यशोधरा पोलीस ठाणे समोर नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १. सागर गणपतराव बागसार, वय ३६ वर्ष, रा. आग्रा, ता. नरखेड, जि. नागपूर २. महिला आरोपी ३. पवन जागोजी बिघाने, वय ४५ वर्ष, रा. आग्रा, ता. नरखेड, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १. इशाकशहा इकबालशहा, वय ३८ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल २. सुरेश भिमराव मोहोड, वय ६० वर्ष, रा. आजनगाव, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे खुर्शिदा महबुब शेख, वय ५३ वर्ष, रा. टेंभरी वार्ड नं ०१, हिंगणा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी नामे १. अभिषेक रंजु समुद्रे, वय २३ वर्ष, रा. वार्ड. नं. २, पारशिवनी, जि. नागपुर २. महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,

नमुद कारवाईत एकुण १९८० मिली देशी दारू, ५० लीटर मोहाफुल दारू असा एकुण ५८८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर